REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

शाळासिध्दी- शाळांच्या गुणवत्ता वाढीचा कार्यक्रम

प्रशांत पंडितराव कोळसे
एम.एस्सी.बी.एड., डी.एस.एम.
न्यू इंग्लिश स्कूल, भाळवणी, ता.पंढरपूर, जि. सोलापूर.

प्रस्तावना :-

२१ व्या शतकातील होणारी महासत्ता म्हणून आज आपण भारताकडे पाहत आहोत.पण आज सुध्दा भारताचा समावेश विकसनशील राष्ट्राच्या गटात होतो आहे. विकसनशील गटातून विकसित गट समाविष्ट करण्याची खरी शक्ती फक्त शिक्षणामध्ये आहे.म्हणून ख-या अर्थाने भारताला महासत्ता बनावयाचे असेल तर शिक्षण व्यवस्थेचा सर्वंकष विचार करणे गरजेचे आहे. भारताला जगावर सत्ता गाजविणारी महासत्ता होण्यापेक्षा जगाला सावरणारी महासत्ता शिक्षण करु शकते. भारत हा संपन्न, समृध्द,बहुआयामी व वैविध्यपूर्ण संस्कृती लाभलेला सर्व समाजाचे कल्याण व लोकशाही मूल्यांची बांधिलकी जपणारा एक स्वतंत्र देश आहे.

अशा या ऐतिहासिक परंपरा लाभलेला देशाला शिक्षणाची देखील एक सामर्थशाली परंपरा आहे.महात्मा गांधी यांनी म्हटल्याप्रमाणे समाजातील अन्याय,हिंसा व विषमता नष्ट करुन राष्ट्राची विवेक शक्ती जागी करण्याचे साधन शिक्षण व्हावे तसेच त्यांच्या मते शिक्षणाचा रोख स्वावलंबन व त्यातून व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर असावा असा होता.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांमुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची निसंदिग्ध ग्वाही देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण व्हावे यासाठी स्वातंत्र्यानंतर केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाने वेळोवळी अनेक अभ्यास आयोगाची स्थापना केली त्याच्या शिफारशी नुसार प्राथमिक शिक्षण सक्तीचे व सर्वांना मोफत करण्यासाठी अनेक नियमावली तयार करण्यात आल्या. त्याच बरोबर अनेक योजना राबवण्यात आल्या . त्यामध्ये मागील काही काळाचा विचार करता

१. १९९५ चा क्षमताधिष्ठीत अभ्यासक्रम
२. सन २००० चा नवीन अभ्यासक्रम व SMART- P.T. प्रशिक्षण
३. D.P.E.P. शिक्षण प्रकल्प
४. आनंददायी शिक्षण
५. LEP कार्यक्रम
६. माझी समृद्ध शाळा उपक्रम
७. सर्व शिक्षण मोहिम अशा अनेक योजना राबवण्यात आल्या.

शालेय शिक्षणाचा प्रारंभ हा मुलांच्या विकासाच्या मार्गावरचा महत्त्वाचा टप्पा असतो. परिसरातून घडणा-या सहज शिक्षणाला,शाळेमध्ये परिपूर्ण व्यक्तिमत्व जडणघडणीसाठी शिक्षणशास्त्रीय, कालमर्यादित, नियोजनाची जोड मिळते. हे नियोजन साध्य करण्यासाठी शाळा, शिक्षक, पर्यवेक्षकीय यंत्रणा असे पाठबळ प्राप्त होते. शिक्षणामुळे व्यक्ती स्वत:चा विकास साधत असताना भोवतालच्या समाजाची संस्कृती आणि परंपरा स्वीकारुन समाजात सामावली जाते. समाजाच्या विकासाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीही शिक्षित व्यक्ती अधिक सक्षम ठरते. व्यक्ती,समाज आणि राष्ट्राचे व्यक्तिमत्व सक्षम आणि समृध्द करण्यास शिक्षण केंद्रिभूत ठरते.महाराष्ट्रामध्ये थोर सुधारकांनी निरनिराळया पर्यायाचा अवलंब करुन मुली,अनुसूचित जाती-जमातीची मुले, या आणि अशा सर्व वंचितापर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची एक प्रेरणादायी परंपरा निर्माण झाली. यातूनच केंद्र सरकारने शाळासिध्दी हा राष्ट्रीय कार्यक्रम जाहीर केलेला आहे. शाळासिध्दी या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात समृध्द शाळा -२०१६ या नावाने करण्यात येत आहे.

गुजरातच्या गुणोत्सव , उडीशाच्या समिक्षा, कर्नाटकाच्या शालेय गुणवत्ता व प्रमाणन , मध्यप्रदेशच्या हमारी शाला ऐसी हो , महाराष्ट्रातील प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमांबरोबरच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधनाचा आधार शाळासिध्दी या कार्यक्रमासाठी घेण्यात आलेला आहे.

शाळा मानके व मूल्यांकनाचा राष्ट्रीय कार्यक्रम (NPSSE) -शाळांना त्यांच्या स्व-सुधारणेत सातत्याने व्यग्र राहण्यास सक्षम करणारे सकारात्मक पाऊल आहे.

- **मार्गदर्शक तत्वे**

✓ संविधानात्मक मूल्ये
✓ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे
✓ अभ्यासक्रम आराखडे
✓ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९
✓ सर्व शिक्षा अभियान
✓ माध्यमिक शिक्षा अभियान

या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून महाराष्ट्रात शाळासिध्दी हा कार्यक्रम शासननिर्णय दि.३० मार्च २०१६ नुसार सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये सात प्रमुख क्षेत्रांतर्गत गाभा मानके दिलेली आहेत. त्यानुसार प्रत्येक शाळांनी शासनर्निर्णय १७ जानेवारी २०१७ नुसार दरवर्षी स्वयंमूल्यमापन करणे बंधनकारक करण्यात आले. राज्याने शाळा स्वयंमूल्यमापन व बाह्य मूल्यमापनासाठी गुणदान पध्दती विकसित केली आहे. त्यानुसार प्रत्येक शाळेने आपल्या शाळेचे स्वयंमूल्यमापन झाल्यावर बाह्य मूल्यमापन करावयाचे आहे. या बाह्य मूल्यमापनासाठी राज्यात मोठ्या प्रमाणावर निर्धारक तयार करण्यात येऊन त्यांना प्रशिक्षित करण्यात आलेले आहे.

❖ **प्रमुख क्षेत्र व गाभा मानके**

	प्रमुख क्षेत्र	गाभा मानके
१	शाळेचे सामर्थ्य स्त्रोत	शालेय आवार २. क्रीडा उपकरणे व साहीत्यासह मैदान ३. वर्गखोल्या व इतर खोल्या ४. वीज व विद्युत उपकरणे ५. ग्रंथालय ६. प्रयोगशाळा ७. संगणक (जेथे तरतूद असेल तेथे) ८. उतरता रस्ता (RAMP) ९. मध्यान्हभोजन , स्वयंपाक खोली व भांडी १०. पेय जल ११. हात धुण्याची सुविधा १२. स्वच्छतागृह
2	अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन	शिक्षकांना अध्ययनार्थीची जाण 2. शिक्षकांचे विषय व अध्यापनशास्त्रीय ज्ञान 3. अध्यापन नियोजन 4. अध्ययनपूरक वातावरण निर्मिती 5.अध्ययन – अध्यापन प्रक्रिया 6. वर्ग व्यवस्थापन 7. अध्ययनार्थीचे मूल्यमापन 8. अध्ययन अध्यापन साहित्याचा वापर 9. शिक्षकांचे स्वत:च्या अध्यापन-अध्ययन कृतीवरील चिंतन
3	अध्ययनार्थी प्रगती, संपादणूक व विकास	अध्ययनार्थीची उपस्थिती 2. अध्ययनार्थीचा सहभाग व व्यग्रता 3. अध्ययनार्थीची प्रगती 4. अध्ययनार्थीचा वैयक्तिक विकास व सामाजिक विकास 5. अध्ययनार्थीची संपादणूक
4	शिक्षक कामगिरी व व्यावसायिक विकासाचे व्यवस्थापन	1.नवीन शिक्षकांचे उदबोधन 2. शिक्षकांची उपस्थिती 3.जबाबदारी निश्चिती व कामगिरी लक्ष्यांची निश्चिती 4. अभ्यासक्रम अपेक्षांप्रति शिक्षकांची तयारी 5. शिक्षक कामगिरीचे पर्यवेक्षण 6. शिक्षकांचा व्यावसायिक विकास
5	शालेय नेतृत्वव व्यवस्थापन	1.दूरदृष्टीचे विकसन 2. बदल व सुधारणेचे नेतृत्व 3. अध्ययन व अध्यापनाचे नेतृत्व 4. शालेय व्यवस्थापनाचे नेतृत्व
6	समावेशन, आरोग्य व सुरक्षा	1. समावेशन संस्कृती 2. विशेष गरजा असणा-या विद्यार्थ्यांचे (CWSN) 3.समावेशन 3. शारीरिक सुरक्षितता 4. मानसिक सुरक्षितता 5. आरोग्य व स्वच्छता
7	उत्पादक समाज सहभाग	शाळा व्यवस्थापन किंवा शाळा विकास व्यवस्थापन समिती संघटन शाळा सुधारणेत भूमिका 3. शाळा समाज अनुबंध 4. अध्ययन स्त्रोत म्हणून समाज 5. समाज सक्षमीकरण

प्रत्येक क्षेत्राची रचना खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

- महत्त्व
- सूचक मार्गदर्शके
- वस्तुस्थितीदर्शक माहिती
- गाभा माणके
- वर्णन विधाने
- पुराव्याचे स्त्रोत
- नाविन्यता
- प्रतिसाद तक्ता
- सुधारणेसाठी नियोजन

शाळासिध्दी कार्यक्रमामध्ये शाळेच्या अंतर्गत मूल्यमापनामध्ये आपण कुठे आहोत हे कळण्यासाठी गाभा मानके व त्यांची वर्णनविधाने पुस्तकात दिलेली आहेत. त्यानुसार प्रत्येक शाळांनी त्या वर्णन विधानानुसार आपण कुठे आहोत याचा विचार करून गुणदान करावयाचे आहे. या सात क्षेत्रांतर्गत ४६ गाभा मानकांमुळे शाळा विकासाची नेमकी स्थिती समजते. आपली शाळा वर्णन विधानानुसार कोणत्या स्तरात आहे, शाळेची ग्रेड कोणती आहे हे समजते. दिलेल्या वर्णन विधानानुसार ४६ मानकामध्ये शाळा स्तर ३ ची पूर्तता करत असल्यास शाळा ए ग्रेड शाळा ठरते. शाळा ब,क,ड मध्ये असल्यास सदर शाळेला त्या ब/क/ड मधून ए ग्रेड मध्ये येण्याचे नियोजन करता येते. सदर नियोजनानुसार शाळा विकासाचा आराखडा तयार करता येतो. या आराखड्यात दिलेल्या नियोजनानुसार शाळेला आपले वार्षिक/ मासिक व दैनंदिन नियोजन करता येते.

प्रत्येक मूल ए ग्रेडच्या शाळेत शिकले पाहिजे यासाठी ए ग्रेड शाळा निर्मितीसाठी शाळासिध्दी हा कार्यक्रम उपयोगी ठरतो. विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक , केंद्रप्रमुख व सर्व अधिकारी वर्गासाठी शाळासिध्दी कार्यक्रमातून कार्य आराखडा व शाळा विकासाचे नियोजन करता येते. सदरची माहिती ही राष्ट्रीय पोर्टलवर असल्याने कोणालाही कोणती शाळा कोणत्या ग्रेडची आहे हे समजते.